# कोरडवाहू फळपीक : बोराचे अन्नद्रव्य व्यवस्थापन

बोर सर्वांच्याच परिचयाचे असून बोराचे शास्त्रीय नाव *Zizyphus jujuba* असे आहे. भारतात बहुतेक भागात आढळून येणारे बोर हे लागवडीखाली अथवा जंगली अवस्थेत विशेष प्रमाणात आढळून येते. प्रामुख्याने पंजाब, उत्तरप्रदेश, हरियाना, राजस्थान, गुजरात, तामिळनाडू, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यामध्ये बोर लागवड केली जाते. बोर लागवडी खालील क्षेत्रासंबधी निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही, कारण पध्दशीरपणे लावलेल्या मळयाची संख्या फार नाही. बोरामध्ये विटॅमिन ए, सी, फॉस्फरस, कॅल्शियम, प्रोटीन, कार्बोहायड्रेट व खनिज द्रव्य असल्याने आहार दृष्ट्या ते अत्यंत पौष्टिक फळ आहे. बोरापासून जाम, कॅन्डी, सुकवलेली बोरे, शरबत, बोरकुट, ई, प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करता येतात. महाराष्ट्रात बोराची झाडे प्रामुख्याने जळगांव, अहमदनगर, सोलापूर व सातारा या जिल्हयात मोठया प्रमाणात आढळून येतात. फळपीकांमुळे मोठया प्रमाणात निर्माण होणारा रोजगार, फळबाग लागवडीसाठी असलेले पोषक वातावरण तसेच कोरडवाहू भागात चांगल्या प्रकारे शेतकऱ्यांनी बोराच्या लागवडीकडे वळल्यास चांगली आर्थिक मिळकत होऊ शकते. जळगांव जिल्हयात मेहरूण बोरे प्रसिध्द आहेत. तसेच पंजाब, उत्तरप्रदेश, हरियाना या राज्यात उम्राण जातीची लागवड केली जाते. बडोदा व अहमदाबाद जिल्ह्यात चांगल्या प्रतीच्या बोरांची लागवड केली जाते व अहमदाबादी बोरे या नावाने बाजारात विकली जातात. कारका व नरमा या जातीची बोरे बनारसमधे प्रसिध्द आहे.

## हवामान:

बोराचे झाड फार काटक असून ते सर्व प्रकारच्या हवामानात वाढते तसेच उष्ण व कोरडे हवामान सुध्दा मानवते. बोराचे झाड दुष्काळी भागात सुध्दा चांगले तग धरून राहू शकते. आर्द्र हवामानात झाडांची वाढ व फळधारणा कमी प्रमाणात होते. बहुसंख्य झाडे जंगली अवस्थेत वाढतात. बोराचे झाड ३७ ते ४२° सें अथवा त्याहून जास्त तापमानात सुध्दा चांगले वाढतात.

## जमीन:

बोर हे कोरडवाहू फळपीक असून ते हलक्या जमिनीत सुध्दा चांगले उत्पादन देउ शकते . बोराची लागवड मुरमाड, खडकाळ,वाळूमय व गाळवट रेताळ जमिनीत चांगली करता येते. कमी पावसाच्या अत्यंत हलक्या व मध्यम खोल जमिनीत हे पीक चांगले येते. त्याकरिता जमिनीवर ६ × ६ मी. व २ × २ मी. फूटाच्या आकाराचे खड्डे करून तलावाच्या गाळाने भरावेत. पावसाळा सूरू होण्यापूर्वी खड्ड्यात बोराच्या दोन ते तीन बिया पुराव्यात.

## लागवड:

बोराची अभिवृध्दी बीयाव्दारे किंवा कलमावर डोळे भरून केली जाते. बियाची पेरणी पावसाळा सुरू झाल्यानंतर करावी. बिया पेरणीपूर्वी दिवसभर पाण्यात भिजवून ठेवाव्यात त्यामूळे उगवण लवकर होते. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी तयार रोपावर जुलै महिन्यात डोळे भरावे त्याकरिता मेहरून किंवा बनारसी अथवा आपल्या भागातील जातिवंत बोराची निवड करावी. डोळे बांधण्यासाठी कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागाची मदत घ्यावी. बोर लागवडीनंतर ४ – ५ वर्षा नंतर फळे येण्यास सुरूवात होते. फळधारणेच्या काळात जमिनीत पुरेशी ओल नसल्यास फळे गळतात. फेब्रुवारी ते एप्रिल अखेरपर्यत फळे काढण्याचे काम सुरू असते.

## छाटणी :

बोराचे कलम, झाडाचे डोळे फुटून आल्यावर नविन फुटीवर ६० सें.मी. पर्यंत येणाऱ्या फांद्या १५ ते २० सें.मी. अंतरावर वाढू द्याव्या. अशा प्रकारे झाडाच्या मजबुत सांगाडा तयार करावा. बोराचे बहार नविन फुटीवर येत असल्याने प्रती वर्ष झाडाची छाटणी करावी. साधारणपणे एप्रिल ते मे महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात बोराच्या झाडावरील रोगट, किडग्रस्त व अनावश्यक जुन्या फांद्या काढून घ्याव्या.

## अन्नद्रव्य व्यवस्थापन:

सर्व साधारणपणे बोराच्या झाडाला नियमित खते दिल्या जात नाहीत परंतू भरपूर व चांगल्या उत्पादनासाठी व फळझाडांच्या आरोग्यासाठी संतुलित खतांच्या मात्रा देणे आवश्यक असते. त्याचबरोबर फळाची प्रत टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक झाडाला उपलब्धेनुसार १० ते १५ किलो चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत द्यावे. सेंद्रिय खते, उपयुक्त जीवाणू, गरजेनुसार रासायनिक खते यांचा संतुलित वापर करावा. त्याचबरोबर हिरवळीचे खत दिल्याने जमिनीची सुपिकता टिकवून राहण्यास मदत होवून फळझाडाला अन्नद्रव्य पुरवठा मिळण्यास मदत होते.

कोरडवाहू जमिनीत बोराच्या लागवडीसाठी वयानुसार जमिनीत प्रती झाडास खत व्यवस्थापन खालील प्रमाणे करता येईल.

| झाडाचे वय (वर्ष) | शेणखत (किलो) | नत्र (ग्रॅम/झाड) | स्फूरद (ग्रॅम/झाड) | पालाश (ग्रॅम/झाड) |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १०० | १०० | १०० |
| २ | २० | २०० | १५० | १५० |
| ३ | ३० | ३०० | २०० | २०० |
| ४ | ४० | ४०० | २०० | २०० |
| ५ व त्यापूढे | ५० | ५०० | २५० | २५० |

## खताची मात्रा प्रति झाड

बोराची लागवड केल्यानंतर पूर्ण शेणखत पावसाचे सुरवातीस व अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पहिल्या पावसानंतर द्यावे, उरलेला अर्धे नत्र ऑगस्ट व सप्टेंबर मधे फळधारणेनंतर द्यावे. अश्या प्रकारे खत व्यवस्थापन केल्यास उत्पादनात वाढ होवून आर्थिक मिळकत मिळण्यास त्याचबरोबर जमिनीची सुपिकता व जमिनीचे आरोग्य सुधारण्यास निश्चीत मदत होईल.

## उत्पादन :

सर्वसाधारणापणे फुलधारणेपासून १२०ते १२५ दिवसात फळे पक्व होतात. पूर्ण वाढ झालेल्या फळांचा रंग बदलण्याच्या स्थितीत असतांनाच ४ ते ५ वेळा तोडणी करावी. साधारणपणे १० वर्षाच्या झाडापासून ८० ते १०० किलो पर्यंत बोराचे उत्पन्न मिळते. उम्राण जातीच्या झाडापासून अंदाजे ८० ते १५० किलो फळे मिळतात.



**अधिक माहितीसाठी**

**प्रमुख शास्त्रज्ञ**

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला दुरध्वनी क्र : ०७२४–२२५८५६९ यांचेशी संपर्क साधावा.

घडीपत्रिका : डॉ. पंदेकृवि/प्रका/१०४१/२०१७



# कोरडवाहू फळपीक : बोराचे अन्नद्रव्य व्यवस्थापन

डॉ. विजय गाभणे	डॉ. महेंद्र नागदेवे
डॉ. प्रदीप डामरे	डॉ. अनिल तुरखेडे

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला